दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०२ डिसेंबर २०२४







## मनोज जरांगे यांचे पुढील उपोषण आझाद मैदानात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, धाराशिव :** सरकार कोणाचेही आले तरी आरक्षण घेणारच. त्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन सुरु आहे. आता सामूहिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरवली सराटीसह प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल. समाजाचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. कदाचित यावेळी मुंबई येथे आझाद मैदानावर असू शकेल, अशी जाहीर घोषणा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केली. विधानसभा निवडणुकीत फॉर्म्युला जुळला नाही अन्यथा सुपडा साफ केला असता, अशा शब्दांत त्यांनी राजकीय टिप्पणीही केली.



जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथून रविवारी तुळजापूर आणि पंढरपूर येथे दर्शनासाठी निघाले होते. धाराशिव जिल्ह्यात त्यांचा ताफा दाखल होताच ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

आरक्षणाची यापुढील लढाई सामूहिक आमरण उपोषणाने केली जाईल. कदाचित हे उपोषण मुंबई येथे आझाद मैदानावरही होऊ शकते. आता आरक्षणाची ही चळवळ थांबवणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात मराठा समाजाशिवाय कोणाचीही सत्ता स्थापन होऊ शकत नाही. यावेळी मराठा समाजाने मोठ्या संख्येने ओबीसी आमदारही निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान फॉर्म्युला जुळून आला नाही. अन्यथा सुपडा साफ केला असता. मराठा आरक्षणासाठी इथून पुढे सामूहिक आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार असल्याचे जाहीर करुन सरकार कोणाचेही असो, मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. त्यासाठी मुंबई येथे आझाद मैदानावरही आंदोलन करण्याची वेळ आल्यास मागे हटणार नाही, असा इशारा जरांगे पाटील यांनी यावेळी दिला.

दरम्यान, जरांगे पाटील यांचा ताफा जिल्ह्यात दाखल होताच महामार्गावरील विविध गावांत त्यांचे फुलांची उधळण करुन स्वागत करण्यात आले. तीर्थक्षेत्र तुळजापुरात मोठ्या जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत मराठा समाजबांधवांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत उत्स्फुर्त रॅली काढली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचा ताफा पंढरपूरकडे रवाना झाला.

## मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांचा जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०१, ठाणे :** आज दिनांक ०१ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याबाबत मनसेचे अविनाश जाधव यांनी पत्रक काढले आहे. विधानसभा निवडणुकीत ठाणे व पालघर येते पराभवाची जबाबदारी घेऊन मी माझ्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे. काम करताना माझ्याकडून कळत नकळत काही चूक झाली असल्यास आपण मना क्षमा करावी. असे पत्रक मनसेचे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांनी काढला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना चे अध्यक्ष राज साहेब ठाकरे त्यांचा राजीनामा स्वीकारतील का?

## विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज सादर करणेकरिता १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** नमुंमपा कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल, विधवा / निराधार, स्थानिक प्रकल्पग्रस्त, सफाई कामगार, नाका कामगार व मागासवर्गीय घटकातील इ.१ ली ते महाविद्यालय पर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण करणे ही योजना ऑनलाईन पध्दतीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता राबविण्यात येत आहे.

उक्त शिष्यवृत्ती योजनेकरीता दि. ०६ सप्टेंबर २०२४ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि. ०७ सप्टेंबर २०२४ ते दि २० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत विहीत नमुन्यात अर्ज ऑनलाईन पध्दतीने www.schemenmmc.com या संकेत स्थळावर स्विकारण्याकरीता जाहीर आवाहन प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने उक्त योजने अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेकरीता दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत प्रथम मुदत वाढ देण्यात आलेली होती. तथापी विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता उक्त योजनेअंतर्गत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेकरीता दि.१५ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत अंतिम मुदत वाढ देण्यात येत आहे. याची कृपया सर्व संबधितांनी नोंद घ्यावी. महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या शिष्यवृत्ती योजनांचा महानगरपालिका क्षेत्रातील गरजू लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

## विधानसभा झाली... आता वेध स्थानिक स्वराज्य संस्थांचे

### इच्छुकांसह कार्यकर्ते, पदाधिकारी लागले कामाला...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, (अहिल्यानगर) :** लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. आता इच्छुकांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीकडे लागले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिकेच्या निवडणुका मागिल अडीच वर्षांपासून प्रलंबित आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांनची मुदत संपून दोन वर्षपेक्षा अधिक कालावधी झाला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिकेच्या निवडणुका लढवण्याच्या आशेने काही जण कामाला लागले होते, मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रेंगाळल्या.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कालावधी संपून दोन वर्षपेक्षा अधिक वेळ झाला आहे. या निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र निवडणूका झाल्या नाही. निवडणूकीसाठी प्रभाग रचना, सदस्य संख्येची तयारी देखील करण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात निवडणुकांना मुहूर्त लागला नाही, ओबीसी आरक्षण व इतर कारणांमुळे निवडणूका रेंगाळल्या. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता इच्छुकांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लागले आहे. मात्र या निवडणुका जाहीर होण्यासाठी २०२५ चे वर्ष उजाडेल. नवीन वर्षाच्या सुरुवातीच्या तीन ते चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुका होतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांमधुन व्यक्त केला जात आहे. इच्छुक मात्र गुडघ्याला बाशिंग बांधून स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीची वाट पाहत आहेत.

**जिल्हा परिषद गटात अनेक इच्छुक**

टाकळी ढोकेश्वर आणि ढवळपूरीसह प्रत्येक जिल्हा परिषद गटांमध्ये तर बरेच इच्छुक कार्यकर्ते नेते मंडळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे डोळे लावून बसले आहेत. विधानसभेची निवडणूक जिल्ह्यात महायुतीच्या पारड्यात पडल्याने प्रत्येक नेता आपापले गणिते, सूत्रे फिरवायला सुरुवात केले आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समितीचे उमेदवारीचे डोहाळे सर्वच पक्षाच्या नेत्यांना लागायला सुरुवात झाली आहेत.

## चोरट्यांनी हद्द केली, वाहनातून 'व्हिस्की'चे १७ बॉक्स ढापले !



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०१, कळंब :** कळंब तालुक्यातून मार्गस्थ होणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर काय काय चोरी जाईल याचा नेम राहिलेला नाही. यापूर्वी चॉकलेट, कपडे, मेंढ्या गायब होण्याचे प्रकार घडले होते. आता चोरट्यांनी चक्क 'व्हिस्की'चे १७ बॉक्स ढापले आहेत. यामुळे ढोसण्यापूर्वीच ढापलेल्या या 'व्हिस्की'ची चांगलीच चर्चा होत आहे.

धुळे-सोलापूर व शेगाव-पंढरपूर हे दोन राष्ट्रीय महामार्ग कळंब तालुक्यातून मार्गस्थ होतात. यातील शेगाव पंढरपूरमध्ये हा बार्शी तालुका हद्द, येरमाळा कळंब ते बीड जिल्हा मांजरा नदी हद्द ही लांबी तर धुळे- सोलापूर महामार्गावर रत्नापूर, येरमाळा, चोराखळी ते वडगाव (ज) ही लांबी तालुक्यातील आहे.

या रस्त्यावर अलीकडील कालखंडात रस्त्यावरून ये-जा करणार्या वाहनांची लूट करण्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. चोरट्यांनी प्रवाशांना तर आपला 'हात' दाखवलाच आहे. शिवाय महामार्गावरून मार्गस्थ होणाऱ्या अनेक मालवाहू वाहनातील माल लंपास केला आहे. याप्रकरणी त्या-त्या वेळी कळंब, येरमाळा ठाण्यात गुन्हे नोंद आहेत. यापूर्वी पिस्तूल लंपास होणे, मेंढ्या गायब करणे, चॉकलेट बिस्किटे चोरणे यांसह मौल्यवान ऐवज गायब झाल्याचे प्रकार समोर आले होते. आता चक्क 'व्हिस्की'च्या बॉक्सची चोरी झाली आहे. मद्यपीने ढोसण्यापूर्वीच चोरट्यांनी ढापलेल्या या 'व्हिस्की'ची थंडगार वातावरणात चांगलीच गरमागरम चर्चा होत आहे.

**कळंब ठाण्यात गुन्हा नोंद...**

मैनुद्दीन रसूल शेख (रा. श्रीपूर ता. माळशिरस) हे बुधवारी एमएच.४५-८५५७ या क्रमांकाच्या वाहनातून 'फॉरेन लिकर'चा माल घेऊन ज्ञश्रीपूर ते यवतमाळ असा प्रवास करत होते. यावेळी त्यांच्या मालवाहू गाडीची ताडपत्री फाडून अज्ञात चोरट्यांनी १८० मिलीच्या व ९४ हजार ६२२ रुपयांच्या ब्लेंडेड विस्कीचे १७ बॉक्स लंपास केले. याप्रकरणी शेख यांच्या फिर्यादीवरून कळंब पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ईव्हिएमच्या माध्यमातून विखेंनी ट्रॅप लावला ! खा.नीलेश लंके यांचा आरोप !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** लोकसभा निवडणूकीत पराभव केला म्हणून मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी ईव्हिएम मशिनच्या माध्यमातून माझ्याविरोधात ट्रॅप लावल्याचा आरोप खा. नीलेश लंके यांनी केला. दरम्यान, महिनाभरात गुड न्युज देतो असे सांगत खा. लंके यांनी आगामी राजकारणातील सस्पेन्स कायम ठेवला.लोकसभा निवडणूकीतील धक्कादायक पराभवानंतर खा. नीलेश लंके समर्थकांचा सुप्यात मेळावा पार पडला.

या मेळाव्यात खा. लंके यांनी आक्रमकपणे भूमिका मांडत विरोधकांवर शरसंधान सोडतानाच समर्थकांचेही कान टोचले. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, या निवडणूकीत यांत्रिकीरणाने घात केला आहे. कोणी काही म्हणत असेल तर मी आमदार नाही तर आज जिल्हयाचा खासदार आहे. प्रस्थापित व घराणेशाही विरोधात माझा उदय झाला आहे. त्यामुळे संघर्ष मला नवा नाही. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असे सांगत समर्थकांचे कान टोचताना विधानसभा निवडणूकीत सतर्क राहिले असते तर आपल्या वाटयाला हा पराभव आला नसता,एकमेकांमधील जिरवाजिरवीचे राजकारण आता बंद करा असा सल्लाही खा.लंके यांनी दिला.यावेळी महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख पदाधिकारी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच निलेश लंके प्रतिष्ठान यांच्यासह खा.निलेश लंके यांच्यावर प्रेम करणारा जनसमुदाय यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**जाती पातीचे राजकारण योग्य नाही !**

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, निवडणूक ही बंदूकीची गोळी असते. एकदा सुटली की सुटली. राजकारणात आज जाती धर्माचा रंग दिला जात असून एक दिवस भारताचा श्रीलंका झाल्याशिवाय राहणार नाही. देश एकसंघ राहण्यासाठी जाती-पातींचे राजकारण योग्य नसल्याचे लंके म्हणाले.

**नीलेश लंके खचणारा नाही !**

विधानसभा निवडणुकीत काठावर पराभव झाला हा निश्चितच चिंतनाचा भाग आहे. तुम्ही आत्मचिंतन करा. आजचा व येणारा काळही आपलाच आहे. निलेश लंके हा उगवता सूर्य आहे,तो खचत नाही. चुक झाली ती झाली आता आरोग्य शिबिराचे आयोजन करून पुन्हा नव्या जोमाने कामाला सुरुवात करू या. आपण आपल्या कामाच्या जोरावर राज्यात ओळख निर्माण केली आहे. विधानसभेत पराभव झाला म्हणून आपले राजकारण संपलेले नाही. चुकांच्या दुरुस्त्या करा. समाजाला दोष देऊ नका असा सल्ला खासदार निलेश लंके यांनी दिला.

## नागपूरकरांचे फोन लागेना, ऑनलाईन पेमेंट देखील होईना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नागपूर :** आजच्या आधुनिक जगात सर्व गोष्टी मोबाईल फोनशी इतक्या जुळलेल्या आहेत की, मोबाईल फोनशिवाय एकही काम पूर्ण होत नाही.

कुणाशी फोनच्या माध्यमातून संपर्क न होणे ही हतबल करणारी स्थिती असते. असाच काहीसा अनुभव रविवारी नागपूरकरांना आला. नागपूरकरांना फोन करण्यात अडचणी निर्माण होत असल्याची तक्रारी शहराच्या विविध भागातून येत होत्या. विशेषत: जिओ दूरसंचार कंपनीचे ग्राहक असलेल्याना या त्रासाचा अधिक सामना करावा लागला. याशिवाय मोबाईल फोनच्या माध्यमातून युपीआय पेमेंट करताना देखील अनेक अडचणी येत असल्याचे दिसून आले.

**फोन कसा लावायचा?**

नागपूरकरांसाठी रविवारची सायंकाळ त्रासदायक ठरली. दुपारी चारनंतर मोठ्या प्रमाणात कॉल ड्रॉपच्या तक्रारी सर्वत्र नागरिकांकडून केल्या जात होत्या. फोन लावल्यावर बीप या ध्वनीसह फोन बंद होत आहेत. शहरात प्रामुख्याने व्होडाफोन-आयडिया, एअरटेल, जिओ या दूरसंचार कंपनीचे ग्राहक आहेत.

मोबाईल नेटवर्कमध्ये समस्या येत असल्याने नागपूरकरांना एकमेकांना फोन लावण्यात अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुरुवातीला ही समस्या व्यक्तिगत असल्याचे समजून अनेकांनी याकडे दुर्लक्ष केले. मात्र फार वेळपर्यंत अशीच समस्या होत असल्याने नागरिकांनी तक्रार करायला सुरुवात केली. जिओच्या वापरकर्त्यांकडून अशाप्रकारची तक्रार जास्त प्रमाणात झाली असल्याची माहिती आहे. याबाबत जिओच्या कस्टमर केअरशी संपर्क साधल्यावर ग्राहकांना फोनमध्ये व्यक्तिगत समस्या असल्याचे उत्तर देण्यात येत आहे. सायंकाळी उशीरापर्यंत ही समस्या कायम होती.

# संपादकीय



## विजय देणाऱ्यांना तरी विसरू नका!

विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेले यश त्यांच्या कार्यकर्त्यांसाठीही धक्कादायक असावे एवढे अभूतपूर्व आहे. संघाने काम केले असले, तरी तेवढ्यामुळे एवढ्या जागा मिळाल्या हे पटणे अवघडच! ईव्हीएमवर शंका घ्यायची की 'लाडक्या बहिणीं'ची किमया मंजूर करायची हा प्रश्न अलाहिदा, पण विजयश्री खऱ्या अर्थाने देणाऱ्यांना अगदी देवेंद्र फडणवीस यांच्यासहित लाडक्या बहिणींना भाजपच्या दिल्लीश्वरांनी विसरू नये, इतकीच अपेक्षा!

भाजपच्या कार्यपद्धतीचा आजपर्यंतचा इतिहास पाहता ज्यांच्यामुळे पक्ष वाढला आणि ज्यांच्या चाणक्यनीतीमुळे पक्षाने विजयश्री खेचून आणली, त्यांना आधी बाजूला सारून पुढे वाटचाल करायची अशीच नीती दिसते. अगदी गोव्यातील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष असो नाहीतर महाराष्ट्रातील बाळासाहेबांची उद्धव ठाकरे यांची शिवसेना असो गेली दोन-तीन दशके हाच कित्ता गिरवल्याचे दिसते. स्वपक्षातील मातब्बर नेत्यांनाही बाजूला सारल्याचे दाखले आहेत. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आणि या दोघांच्या पश्चात त्यांचे कुटुंब, नितीन गडकरी, प्रकाश जावडेकर, एकनाथ खडसे, महादेव शिवणकर, पांडुरंग फुंडकर, किरीट सोमैया, प्रकाश मेहता, विनोद तावडे, पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार अशी ढिगाने उदाहरणे देता येतील. देवेंद्र फडणवीस त्याच रांगेत असल्याचे आज जाणवते.

**महाराष्ट्रात असे होऊच कसे शकते?**

सर्व काही अदानींच्या घशात घालण्याचे मोदी सरकारचे षड्यंत्र उघड आहे. धारावीसह मुंबईच्या आसपासचा महानगरातील प्रदेश, कोल्हापुरातील पाणी, चंद्रपूरमधील खाणी, शाळा, पालघरमधील वाढवण बंदर, मुंबई-नवी मुंबईचे विमानतळ, महाराष्ट्रभरातील वीज असे बरेच काही थेट अदानी समूहाच्या घशात जात आहे, गेले आहे. मुंबई महानगरपालिका ज्यांच्या नेतृत्वात त्यांच्या हातात देशाची आर्थिक राजधानी राहते. त्यामुळे मुंबईसह इतर महानगरपालिकांच्या निवडणुकाच होणार नाहीत याची तजवीज केली गेल्याची शंका येते. महाराष्ट्रातले प्रमुख आकर्षक उद्योग गुजरातला नेण्यात आले. प्रस्तावित आयएफएससी, वेदांता फॉक्सकॉन, टाटा एअरबस, बल्क ड्रग पार्क, नॅशनल मरीन पोलीस अकॅडेमी आणि नॅशनल सिक्युरिटी गार्ड्स, हिरे बाजार, टेस्ला प्रकल्प, हे व असे अनेक प्रकल्प भाजप सरकारच्या काळात गुजरातमध्ये नेले गेले. तरुण आणि शेतकऱ्यांत असंतोष उसळला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्गातील पुतळा कोसळला. त्या पुतळ्याच्या कामातही भ्रष्टाचार झाल्याचे महाराष्ट्र पाहत होता. तरीही या सरकारला महाराष्ट्राने भरघोस मतांनी निवडून आणले, हे खरेच अशक्य वाटते.

**घोषणा केल्या, पण**

महाराष्ट्रात भाजपला मिळालेली मते ही केवळ भाजपची नसून ती राज्यातील लाडक्या बहिणींनी त्यांना मिळालेल्या रकमेच्या बदल्यात दिलेली ओवाळणी आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आता महायुती त्यांचा वचनभंग करणार नाही, अशी अपेक्षा आहे. मात्र इथूनच अग्निपरीक्षा सुरू होणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधीची जुळवाजुळव करणे राज्याच्या घटत्या महसुलात आणि वाढत्या कर्जात कसे शक्य होणार हा खरा प्रश्न आहे. या वर्षीच्या आर्थिक पाहणी अहवालात राज्यावरील एकूण कर्ज आणि देणी ही गेल्या वर्षीच्या तुलनेत १६.५ टक्क्यांनी वाढल्याचे म्हटले आहे. ती एकूण उत्पन्नाच्या १७.६ टक्के आहेत. राज्यावर एकूण सात लाख ११ हजार कोटी रुपये कर्ज आणि देणी यांचा भार सध्या आहे.

महायुती सरकारने अर्थसंकल्पात अनेक लोकप्रिय योजना जाहीर केल्या. त्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, तीर्थाटनासाठी योजना, विविध समाजवर्गांसाठी योजनांचा त्यात समावेश होता. या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारने २७० कोटी रुपयांची तरतूद केली. मुद्रित, दृक्-श्राव्य जिंगल्स, माहितीपट, लघुपट इत्यादीसाठी तीन कोटी रुपये, वर्तमानपत्रांसाठी ४० कोटी रुपये, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, एफएम रेडिओ आदीसाठी ३९ कोटी ७० लाख रुपये, होर्डिंग्ज, बसवरच्या जाहिराती इत्यादींवर १३६ कोटी ३५ लाख रुपये, समाजमाध्यमांवर ५१ कोटी रुपये एवढी उधळण सरकारी तिजोरीतून करण्यात आली. यामुळेच आर्थिक शिस्त बिघडते. आता लाडक्या बहिणींना द्यायला तिजोरीत निधी असेल का? कारण राज्यातील महायुतीने दिलेल्या वचनांचा पाढा वाचला तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना: दरवर्षी ५० हजार कोटींचा खर्च, अडीच कोटी लाभार्थी. मुख्यमंत्री वयोश्री योजना : दरवर्षी ९००० कोटींचा खर्च, १८ लाख लाभार्थी, मुलींना मोफत उच्चशिक्षण : २० लाख लाभार्थी मुली, दरवर्षी १८०० कोटींचा खर्च, पिंक (गुलाबी) ई-रिक्षा : १७ शहरांमधील १० हजार महिलांना लाभ देण्याचे उद्दिष्ट, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना : दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना लाभ, दरमहा ६ ते १० हजारांचे विद्यावेतन, पंढरीत येणाऱ्या मानाच्या पालख्यांना निधी : ३४४ पालख्यांना प्रत्येकी २० हजार रुपये, एक रुपयात पीकविमा : एक ते सव्वा कोटी शेतकऱ्यांना लाभ, दरवर्षी ७०० कोटींचा खर्च, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'मधील महिलांना दरवर्षी ३ गॅस सिलिंडर मोफत, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना : वयोगट ६० वर्षे पूर्ण, प्रतिप्रवासी ३० हजार रुपये, नमो शेतकरी सन्मान निधी योजना : ९२ लाख शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून दरवर्षी ६ हजार कोटी. अशी हजारो कोटींची उधळण महायुतीने केली होती. या सर्व योजना आणि केलेल्या घोषणा खरेच येणारे सरकार पूर्ण करू शकणार आहे का?

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल...

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे.

दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड



वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मुंबई रेल्वेच्या ताफ्यात लवकरच दाखल होणार तब्बल नवीन ३०० ट्रेन

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, मुंबई :** लोकल रेल्वे ही समस्त मुंबईकरांची जीवनवाहिनी.परंतु दिवसेंदिवस मुंबई आणि परिसरातील वाढती लोकसंख्या पाहता हीच रेल्वे सेवा वारंवार विस्कळीत होण्याचे प्रकार वारंवार होत आहेत.परिणामी रोज रेल्वेने प्रवास करणाऱ्या मुंबईतील चाकरमान्यांचे रोज अतोनात हाल होत असतात.रेल्वेवरील वाढलेला प्रचंड ताण आणि इतर तांत्रिक बिघडांमुळे रोज कित्तेक प्रवासी हकनाक आपल्या जीवाला मुकतात.या आणि अशाच सर्व अडचणींवर मात करून चाकरमान्यांना चांगली सेवा देण्यासाठी रेल्वे प्रशासन नेहमीच प्रयत्नशील असते. याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारने मुंबईकरांसाठी नवीन वर्षात खास गिफ्ट देण्याचे ठरवले आहे. मुंबई करांचा रेल्वे प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी लवकरच मुंबईमध्ये ३०० नव्या लोकल ट्रेन्स दिल्या जाणार आहेत.तसेच वसईमध्ये मेगा रेल्वे टर्मिनल्स देखील उभारले जाणार आहे. माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. तसेच याबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

समृद्ध आणि विकसित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल टाकत ३ मोठ्या परियोजनांना केंद्राने



मंजुरी दिली आहे. पोर्ट कनेक्टिव्हिटीला प्रोत्साहन देण्यासाठी पूर्वांचल ते मुंबईलला जोडण्यासाठी कॉरीडोर तयार करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेतील परेल, एलटीटी, कल्याण आणि पनवेल या टर्मिनल्सची क्षमता वाढवण्यात येणारा आहे.

रेल्वेने मुंबई सेंट्रल आणि वांद्रे स्थानकांची क्षमता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जोगेश्वरीमध्ये नवी टर्मिनल्स आणि वसईमध्ये मेगा रेल्वे टर्मिलन्स उभारण्यात येणार आहे. मुंबई लोकल ट्रेन्समध्ये अतिरिक्त ३०० नवीन ट्रेन्स जोडल्या जाणार आहेत.

या परियोजनांमुळे लाखो मुंबईकरांचा प्रवास आरामदायी आणि सुखकर होणार आहे. यासोबतच एमएमआर रिजनमध्ये कनेक्टिव्हिटी, व्यापार वाढणार असल्याचे फडणवीस यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर म्हटले आहे.

दरम्यान महाराष्ट्र सरकारकडून लवकरच सर्व लोकलचे रुपांतर एसी लोकलमध्ये करण्यात येणार आहे. मुंबईकरांचा प्रवास अधिक आरामदायी करण्यासाठी प्रशासनाकडून हा प्रयत्न करण्यात येणार आहे. उन्हाळ्याच्या काळात लोकलमधील गर्दीमुळं प्रवाशांना खूप त्रास होतो. गर्दी आणि घामाच्या धाराने मुंबईकर हैराण होतात. एसी लोकलमुळं प्रवाशांचा त्रास वाचणार असून त्यांचा प्रवासही अधिक आरामदायी होणार आहे. एसी लोकलमुळं रेल्वेचे नेटवर्कमध्ये ही आधुनिकीकरण होईल. एसी लोकलमुळं प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील सुटेल. गर्दीमुळं व दरवाजात उभं राहिल्यामुळं अपघाताच्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. धावत्या लोकलमधून होणारे प्रवाशांचे मृत्यू हा गंभीर प्रश्न होता. मात्र, एसी लोकलमुळं हा प्रश्न सोडवता येऊ शकतो. एसी लोकलचे दरवाजे बंद असतात त्यामुळं नागरिकांचा प्रवास सुरक्षित होऊ शकतात. दरम्यान, मुंबई लोकलमधून दररोज ७.५ लाख नागरिक प्रवास करतात. जगातील सर्वात जास्त व्यस्त असलेले उपनगरीय रेल्वेचे जाळे आहे. मुंबईल लोकलचे जाळे ३९० किमीपर्यंत पसरले आहेत. यात तिन प्रमुख मार्गिका आहेत. पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्ग. या तिन्ही मार्गावर लोकल धावतात. पश्चिम रेल्वेवरील वातानुकूलित लोकल फेऱ्यांना वाढती मागणी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे प्रशासनाने २७ नोव्हेंबरपासून १३ अतिरिक्त वातानुकूलित लोकल फेऱ्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेवरील वातानुकूलित लोकल फेऱ्यांची संख्या ९६ वरून १०९ वर पोहोचली आहे.

## लॉटरी..

कुणा मिळेलं डच्चू
कुणा लागेलं लॉटरी
मंत्री मंडळ स्थापना
जशी खोलेलं पोटरी

नाव नोंदणी कराया
सजून बसले नोटरी
सूर्यप्रकाश असूनही
पेटवून पाहती बॅटरी

यंदा लागणार वर्णी
करी आवरा आवरी
श्रेष्ठीमात्र सरावलेले
करती सावरासावरी

ऐनवेळी नाव वगळे
कृपा होई नव्यावरी
सवय असे नेहमीची
हेच घडते वरचेवरी

पाहुण्याची सरबराई
मित्रपक्ष मिन्नतवारी
आषाढी न् कार्तिकी
निष्ठावान करी वारी

पक्षांमध्ये वरचे थरी
कुणीतरी हो कैवारी
लग्ने होई विधुरांची
तशीचंबसते कुवारी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# नवी मुंबई महानगरपालिका उत्पन्न वाढीसाठी टास्क फोर्स




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीकडे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बारकाईने लक्ष देत विशेष कार्यबळाची अर्थात टास्क फोर्सची स्थापन केली असून ही पाच सदस्यीय समिती महानगर पालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता उपाय सुचविणार आहे. त्यामध्ये थकबाकी वसूलीकरिता व विद्यमान वसूलीकरिता नियोजन करुन सोबतच उत्पन्नवाढीचे नवीन स्त्रोत सूचित करणार आहे. याबाबतचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले आहेत.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा टास्क फोर्स कार्यरत असणार असून मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मालमत्ता कर विभागाचे उप आयुक्त शरद पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण असे चार सदस्य महानगरपालिकेच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नियोजन करणार आहेत.

उत्पन्नवाढीसाठी उपाय सूचविताना टास्क फोर्सने विद्यमान कार्यपध्दतीमध्ये कोणते बदल करावे लागतील याच्या सूचना कराव्यात व असे बदल केल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशा पध्दतीने व किती दिवसात करता येईल आणि कधीपासून उत्पन्नवाढ होईल हे प्रस्तावात नमूद करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

थकबाकी, चालू वसूली व नवीन स्त्रोतामधून अपेक्षित वाढ याचे नियोजन सादर करण्याच्याही सूचना देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय खर्चात बचत ही एक प्रकारे उत्पन्नवाढ असून त्यादृष्टीने आवाजावी खर्च टाळून व आवश्यक तेथे काटकसर करुन खर्चामध्ये किती बचत होईल याचीही माहिती सादर करण्याचे आदेशात नमूद आहे.

त्यासोबतच शक्य आहे तेथून शासन निधी प्राप्त करुन घेण्यासाठी करावयाचे प्रयत्न आणि अशी कामे शासन निधीतून करुन महानगरपालिकेचा निधी इतर सुविधा कामांसाठी वापरण्याबाबत सूचना कराव्यात असे सूचित करण्यात आले आहे. दुबार योजनांचा शोध घेऊन त्या योजना बंद करण्याबाबत अभिप्राय द्यावेत तसेच इतर महानगरपालिकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उत्पन्न वाढीच्या चांगल्या कार्यपध्दती अभ्यासून त्यांचे अनुकरण करण्याबाबत सूचना कराव्यात असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

उत्पन्नवाढीबाबत विविध विभागांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे सविस्तर अवलोकन करुन टास्क फोर्सने महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीचा विभागनिहाय प्रस्ताव सादर करावा, तसेच त्याच्या अंमलबजावणीचे नियोजन करावे आणि त्याबाबतचा अहवाल महापालिका आयुक्तांकडे सादर करावा असे आदेशात सूचित करण्यात आले आहे.

महानगरपालिकेस विविध करांतून प्राप्त होणाऱ्या महसुलातूनच विविध नागरी सुविधांची परिपूर्ती केली जात असल्याने नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीकडे विशेष लक्ष दिले आहे.

आयुक्तांमार्फत प्रत्येक विभागामार्फत होणाऱ्या करवसूलीचा नियमित आढावा घेण्यात येत असतो. आता उत्पन्नवाढीसाठी आयुक्तांनी टास्क फोर्सची स्थापना केली असून या माध्यमातून महानगरपालिकेचे आर्थिक सक्षमीकरण होणार आहे व त्यातून नवी मुंबईकरांना अधिक उत्तम व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल यांची जयंती साजरी



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०१, उल्हासनगर (ठाणे) :** १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक, भारत मातेचे सुपुत्र अँड.विठ्ठल लक्ष्मण कोतवाल उर्फ हुतात्मा वीर भाई कोतवाल यांची ११२ वी जयंती क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक समितीच्या वतीने क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल चौक,उल्हासनगर कँम्प नंबर -४ येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल यांच्या स्मृतीला उजाळा देऊन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवसेना प्रवक्ता किरण सोनावणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भाई कोतवाल यांच्या सामाजिक आणि राजकीय जीवन संघर्षाच्या इतिहासाला उजाळा दिला.तसेच समितीचे सल्लागार माजी नगरसेवक राज असरोंडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भाई कोतवाल यांच्या जीवनातील विविध पैलूंवर भाष्य केले.समितीचे सचिव अनिल बोरनारे यांनी भाई कोतवाल यांच्या प्रेरणादायी जीवन कार्याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस व्यक्त केला.समितीचे अध्यक्ष मनोज कोरडे यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांचे तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे आभार मानले.याप्रसंगी प्रसिद्ध कला निर्देशक किशोर कदम, अँड शैलेश पगारे स्मारक समितीचे उपाध्यक्ष संदिप सायखेडे, कोषाध्यक्ष अशोक जगताप, उपसचिव संतोष खंडागळे, उप कोषाध्यक्ष मधुकर कोकाटे, कार्याध्यक्ष अंकुश श्रीखंडे, उप कार्याध्यक्ष संदिप रावताळे, देखभाल समितीचे दिनेश सोनावळे, रवींद्र बोरनारे, सदस्य राजन चव्हाण, सचिन पवार यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

## सुपा येथे आज भव्य सत्संग सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सुपा येथिल श्री स्वामी समर्थ केंद्रामार्फत आज (दि.२ डिसेंबर) सकाळी ११ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालय,सुपा वाळवणे रोड येथे गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांच्या उपस्थितीत भव्य सत्संग सोहळा व अमृततुल्य हितगुज असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास साधकांनी व सेवेकरी भक्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुपा श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अखिल भारतीय स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित महाशक्ती पीठ (त्र्यंबकेश्वर) मानवी जीवनाशी संबंधित शेतशास्त्र, आयुर्वेद, विवाह संस्कार, मराठी अस्मिता, भारतीय संस्कृती, प्रश्नोत्तर बालसंस्कार, स्वयंरोजगार अशा महत्वपूर्ण विषयावर चंदकांत दादा मोरे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचा पारनेर तालुक्यातील तसेच परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन स्वामी समर्थ केंद्राच्या सेवेकऱ्यांनी केले आहे.

## टाकळी ढोकेश्वर येथील विज्ञान - गणित प्रदर्शन

### ज्ञान, विज्ञान हा जीवनाचा पाया : डॉ.खिलारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर)** : ज्ञान व विज्ञान हा जीवनाचा पाया आहे, असे प्रतिपादन सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल ढोकेश्वर विद्यालयाने आयोजित केलेल्या शाळा स्तरावरील गणित - विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून डॉ.खिलारी बोलत होते. याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महात्मा

फुले यांच्या जीवनावर विद्यार्थी व शिक्षक यांनी मनोगत व्यक्त केले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी जवळपास ५० विविध प्रकारचे विज्ञानाचे आणि गणिताचे उपकरणे तयार केले होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी परिसरातील नवोदय विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील काही विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन लाभ घेतला. या कार्यक्रमात संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य सुनील वाव्हळ, पर्यवेक्षक शिवाजी सावंत, संतोष सोनवळे, पालक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष इंगळे यांनी केले तर प्रस्ताविक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. प्रा.भाऊसाहेब हिंगडे यांनी आभार मानले.

## श्याम ठाणेदार यांचा संविधान रक्षक पुरस्काराने गौरव




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, दौंड :** सम्यक ग्लोबल फाऊंडेशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) दौंड यांच्या मार्फत देण्यात येणारा जिल्हास्तरीय संविधान रक्षक पुरस्कार २०२४ स्तंभ लेखक श्याम ठाणेदार यांना संविधान दिनी मान्यवरांचा हस्ते समारंभपूर्वक देण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनाचे औचित्य साधत २६ नोव्हेंबर रोजी दौंड येथे संविधान सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी समाजातील विविध मान्यवरांना संविधान रक्षक, रिपब्लिकन योद्धा, समाज रत्न व माता रमाई रत्न अशा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्याम ठाणेदार हे विविध वर्तमानपत्रातून महापुरुषांचे विचार पोहचवण्याचे तसेच आपल्या लेखणीच्या माध्यमातून संविधान जागृतीचे काम करतात त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

संविधानची पुस्तिका व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) महिला उपाध्यक्षा प्रियदर्शनी ताई निकाळजे, मराठी मुस्लिम चळवळीचे प्रणेते व दंगा मुक्त महाराष्ट्र अभियानाचे अध्यक्ष माननीय शेख सुभान अली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे जिल्हाध्यक्ष सचिन खरात, माजी शिक्षणाधिकारी बी.वाय.जगताप, प्रा. भीमराव मोरे, आबासाहेब वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मोबाईल शॉपी फोडणारे आरोपी धाराशिव पोलीस स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

### ५ लाख ३५ हजार २०६ रूपये किंमतीचे २५ मोबाईल फोन मुद्देमाल जप्त




**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०१, धाराशिव :** भूम शहरातील जय म्युझिकल अॅण्ड मोबाईल शॉपी नावाचे मोबाईल दुकानाचे शटर लॅक तोडून अज्ञात व्यक्तीने दुकानात प्रवेश करून दुकानातील वेगवेगळ्या कंपनीचे टेक्नो एच.एम.डी. विवो, सॅमसंग झेड फोल्ड ६, वन प्लस १० आर, रेडमी कंपनीचे एआर बडस, रेडमी कंपनीचे स्मार्ट वॉच असे एकुण ६ लाख ८९ हजार ८६६ रू किंमतीचा माल चोरट्यांनी चोरले असल्याचे फिर्याद १९ नोव्हेंबर रोजी मोहन रामचंद्र बागडे यांनी भूम पोलिस ठाण्यात दिली तक्रारी वरून अज्ञात चोरट्यांन विरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

जिल्ह्यातील विविध गुन्हा तपास दरम्यान धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पथकाने काही मोबाईल फोनचे लोकेशन धाराशिव, भुम, मोहा, ढोकी, माळकरंजा असे वेगवेगळ्या ठिकाणी येत असल्याने पथकाने नमुद ठिकाणी जावून शोध घेतला. मोबाईल सिमचा धरक यास त्याच्या ताब्यात असलेल्या मोबाईल फोन बाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, मागील चार दिवसापुर्वी भिमा काळे रा.सांजा रोड धाराशिव याच्याकडून पावती नंतर देतो अशा अटीवर ५,०००रू ला विकत घेतला आहे असे सांगितले.

त्यानंतर संशयित सिम ९३५६३६४३१९ चे लोकेशन भुम येथे येत असल्याने पथकाने नमुद ठिकाणी जावून तेथे एक महिला मिळून आली. तिस तिच्या ताब्यात असलेल्या मोबाईल बाबत विचारपुस केली असता तिने सांगितले की, माझा मुलगा राजु अर्जुन काळे याने आणून घरी ठेवला आहे. असे सांगितल्याने राजा अर्जुन काळे याचा शोध घेतला असता तो गोलेगाव ता.भुम येथे मिळून आला. त्यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्या बाबत कसून चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी व माझा साथीदार सुभाष श्रीरंग चव्हाण रा.ढोकी ता.जि.धाराशिव असे आम्ही दोघांनी मिळून भुम येथील मोबाईल शॉपी दुकानाचे शटर तोडून दुकानातील बरेच मोबाईल चोरी केले आहेत. असे सांगितल्यावरून पथकाने ढोकी येथे जावून सुभाष श्रीरंग चव्हाण यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्या संबंधाने चौकशी केली असता राजा काळे याने सांगीतले प्रमाणे गुन्हा मी व राजा अर्जुन काळे असे आम्ही दोघांनी केल्याचे कबूल केले. त्यावर पथकाने त्या दोघांनी काढून दिलेले मोबाईल हस्तगत केले. नमूद चोरीतील २५ मोबाईल फोन असा एकुण५ लाख ३५ हजार २०६ रू किंमतीचा माल हस्तगत करुन पुढील कारवाई स्तव नमूद दोघांना चोरीच्या मोबाईल फोन सह भुम पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

## येथुन पुढील कोणत्याही निवडणुकीत पराजय होणार नाही- माजी आ.राजन पाटील



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०१, पंढरपूर :** मोहोळ विधानसभा निवडणुकीत झालेला हा पराभव आम्हाला मान्य असून या पुढील निवडणुकीत आमचा पराभव होणार नाही हे मी ठामपणे सांगतो हा पराभव शेवटचा पराभव असेल. याचबरोबर मागील तीन पिढ्यापासून विधानसभा मतदारसंघातील जनतेने आमचे नेतृत्व स्वीकारले आहे.

यावेळी जनतेनेच आम्हाला नाकारले आहे. त्यामुळे कोणत्याही कार्यकर्त्याचा दोष नाही. कोणीही विजयाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नका. जनतेने दिलेला निर्णय मला मान्य आहे. माझ्या आई-वडिलांची शिकवण आहे. जय पराजय हसतमुखाने स्वीकारायचा असतो असे प्रतिपादन राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष आणि मतदार संघाचे माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महायुतीतील सर्व मित्र पक्षांच्या संवाद मेळावा रविवार, दि.०१ डिसेंबर रोजी घाटुळे मंगल कार्यालय अनगर येथे घेण्यात आला. याप्रसंगी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

एकदा पराभव होतो, म्हणजे सर्व काही गमावलं असं नाही. पूर्वीप्रमाणेच मी तुमच्याबरोबर आहे. मी तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही.

नगरपरिषद, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे निवडणूक लागणार आहेत. सर्व गावांमध्ये जाऊन आपल्याला काम करणे गरजेचे आहे. पराभव जरी झाला असला तरी येणाऱ्या काळात मी तुमच्याबरोबर आहे आठवड्यातील एक दिवस मतदार संघासाठी देणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार यशवंत माने यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील होते. प्रमुख उपस्थिती लोकनेते कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, ज्येष्ठ नेते कल्याणराव पाटील, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्षा वर्षाराणी शिंदे, ज्योत्सना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माने म्हणाले मला १५ ते १७ दिवसांमध्ये मालकांनी आमदार करून पाठवलं होतं. माझी जबाबदारी येणाऱ्या पाच वर्षामध्ये आहे.

येणाऱ्या कालावधी मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर बाळराजे पाटील यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी करणार आहे. चांगल्या प्रकारचे नेतृत्व या ठिकाणी युवकांमध्ये आहे.

ही निवडणूक विकास कामावर झाली नसून अपप्रचारावर आणि पैशावर झाली असल्याचे यावेळी माने यांनी स्पष्ट येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्व पदाधिकारी यांनी केवळ नावाला पदी न घेता काम करून दाखवा असेही यावेळी त्यांनी बोलून दाखवले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसह महायुतीतील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

> विकास कामावर झाली नाही. मागील १० वर्षांमध्ये मतदारसंघांमध्ये विकास झाला नव्हता. माजी आमदार यशवंत माने यांच्या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये मागील दहा वर्षाचा बॅकलॉग भरून काढला होता. साडेतीन हजार कोटी रुपयाचा निधी मतदार संघासाठी दिला आहे. जनतेने विकास काम पाहिले नाही. इथून पुढे पक्ष बांधणीसाठी जास्त लक्ष देणार असुन कार्यकर्त्यांनी खचून न जाता नव्या उमेदीने तयारीला लागावे.
>
> **- बाळराजे पाटील (चेअरमन लोकनेते कारखाना)**

## अहिरेतील मताधिक्यामुळे नितीन ओव्हाळ तालुक्यात चर्चेत



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०१, खंडाळा (सातारा) :** विधानसभा निवडणुकीत वाई -खंडाळा -महाबळेश्वर मतदार संघात महायुतीचे अधिकृत उमेदवार जननायक आमदार मकरंद लक्ष्मण जाधव पाटील यांनी ६१ हजार पेक्षा अधिकच्या मताधिक्याने निवडून येत विजयी चौकर मारत मंत्री पदासाठी दावेदार ठरले असले तरी खंडाळा तालुक्यातील त्यांचे गतवेळेचे १४५०० असलेले मताधिक्य घटून १०००० वर आले.

तालुक्यातील सर्व मात्तब्बर विरोधक दिग्गजांनी एकत्र येत तुतारी हाती घेतल्याने आमदार मकरंद पाटलांचे मताधिक्य कमी झाल्याचे दिसत आहे.

मात्र असे असताना अहिरे गावात मात्र आबांच्या नवख्या शिलेदार असणाऱ्या नितीन ओव्हाळ यांनी आपल्या मोजक्या कार्यकर्त्यांच्या साथीने एकाकी खिंड लढवत आमदार पाटील यांना मताधिक्य मिळवून दिल्याने तालुक्यात त्यांचे विशेष कौतुक होत आहे. अहिरे गावात माजी सभापती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष रमेश धायगुडे पाटील व तालुका भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष ऋषिकेश धायगुडे पाटील या दोन कट्टर विरोधी नेत्यांनी एकत्र येत आमदार मकरंद पाटील विरोधी भूमिका घेत अहिरे गावातून आबांचे मताधिक्य कमी करण्याचा प्रयत्न केला.प्रथमदर्शनी आमदार पाटलांचे मताधिक्य अहिरेतून कमी होतेय कि काय?

याची तालुक्यात चर्चा होती मात्र जननायक आमदार मकरंद पाटील यांचा मतदार संघात असलेला दांडगा जनसंपर्क तसेच आपल्या मोजक्या शिलेदारांना सोबत घेवून नितीन ओव्हाळ यांनी एकाकी खिंड लढवून जननायक आमदार मकरंद पाटलांना मताधिक्य दिल्याने तालुक्यातील कार्यकर्त्यामध्ये अहिरेतून ओव्हाळ साहेबांनी आबांना दिलेल्या मताधिक्याची जोरदार चर्चा होताना दिसत आहे.

आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आबांचा हा शिलेदार खेड जि.प.गटात नक्कीच निर्णायक भूमिका बजावेल असे दिसतेय.

## आवक वाढल्याने मिरची, आले, फ्लॉवरच्या दरात घट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, पुणे :** मार्केट यार्डातील घाऊक बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक अल्पशी वाढली. हिरवी मिरची, ढोबळी मिरची, आले, फ्लॉवरच्या दरात घट झाली. शेवग्याच्या दरात वाढ झाली असून, अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १४ ते १५ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून ४ ते ५ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ७ ते ८ टेम्पो गाजर, मध्य प्रदेशातून १२ ते १३ ट्रक मटार, तामिळनाडूतून २ टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेशातून ९ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली.

अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५५० ते ६०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो सात ते आठ हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर १० ते १२ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, भुईमूग शेंग ४० ते ५० गोणी, कांदा १०० ते १२५ ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० ते ४५ टेम्पो बटाट्याची आवक झाली.

अक्षराज



## खरीप हंगाम संपल्यावर मजुरांचे स्थलांतर

# हाताला काम नसल्याचा परिपाक; मुले शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०१, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील जनतेचा उदरनिर्वाह मुखत्त्वे शेतीवर अवलंबून आहे. खरीप हंगामाच्या कापूस, सोयाबीन या नगदी पिकांवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना शेती रिकामी झाल्यावर कामाच्या शोधात इतरत्र भटकंती करावी लागते. सरसकट सोयाबीनची काढणी झाली असून कापसाची वेचणी ही अंतिम टप्प्यात येऊन घेतली आहे. त्यामुळे हाताला काम नसल्याने मजूर वर्गणी आपला मोर्चा मोठ्या शहरांकडे वळविला आहे. किनवट तालुक्यातील मजुरांकडे हाताला काम नसल्याने ते आता तेलंगणा आंध्र प्रदेश कर्नाटका औरंगाबाद मुंबई अशा राज्याकडे आणि पश्चिम महाराष्ट्रात ऊसतोड कामगार म्हणून स्थलांतरित होतात.

आपल्या मुलांचे शिक्षण अर्धवट सोडून काही खेडेगावातील लोक आता घराला कुलूप लावून विराड डोक्यावर घेऊ ऊस तोडीसाठी स्थलांतर करीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या बाबीला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित होत आहे.

तालुक्यातील जनतेला कामाच्या शोधात भटकंती करावी लागत आहे. या गंभीर प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढणारा भगीरथ लोकप्रतिनिधी उदयास येईल का, असा सवाल केला जात आहे. तालुक्यातील शेतमजूर दरवर्षी स्थलांतरित होतात, अशा स्थितीत त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागते. किनवट तालुक्यामधील ऊसतोड कामगारांसाठी स्थलांतरित म्हणून होत चाललेली आहे. अनेक जिल्ह्यात तालुक्यातील मजूर आपल्या मुलाबाळासह ऊस तोडणीच्या कामावर निघून जातात. दिवाळीच्या आधीच अनेक कुटुंब तेलंगणा येथे कापूस वेचणीकरिता निघून जातात.


आपल्यानंतर आपल्या मुळा बाळांची काय होईल या काळजीने शिकत असलेल्या लहान मुलांना देखील आपल्या सोबत घेऊन जातात. त्यामुळे ही मुले शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहतात व पुढे ते देखील हेच काम करतात. या गंभीर बाबीकडे प्रशासन लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

तालुक्यातील लोकप्रतिनिधी फारसे लक्ष देत नसल्याचा आरोपही या निमित्त्याने होत आहे. जर शेतकऱ्यांना आणि शेतमजूरांना इथेच रोजगारांची सुविधा उपलब्ध असती तर या कुटुंबावर आपल्या चिमुकल्यासह स्थलांतरित होण्याची वेळ आली नसती.

मात्र वास्तव फार भयानक असल्यामुळे या परिस्थितीला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित होत आहे.

## थोडक्यात

### खा.रविंद्र चव्हाण यांची हदगावला धावती भेट



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०१, हदगांव (नांदेड) :** नांदेड लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे नवनिर्वाचित खासदार प्रा.रविंद्र चव्हाण यांनी नुकतीच हदगाव ला भेट दिली. त्याप्रसंगी कॉंग्रेस शहराध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष खदिरखाँन हाजी वाहेदखाँन आणि आदर्श विद्यार्जन मंडळाद्वारा संचलित पंचशील प्रशालेच्या वतीने संदिप ढोले यांनी खा.रविंद्र चव्हाण यांचा सत्कार केला. याप्रसंगी माजी नगरसेवक तथा हदगावच्या सोसायटीचे संचालक शफी पटेल, गोजे गावचे माजी सरपंच आयूबशेठ, प्रदिप उर्फ पंजाबराव देशमुख खरेदी विक्री संघाचे प्रभाकर पत्तेवार, माजी नगराध्यक्ष गणेशशेठ तोष्णीवाल, माजी उपनगराध्यक्ष वसंतराव देशमुख, दत्तू शिंदे, हनुमंतराव पाटील आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवास उत्साहात सुरुवात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नांदेड :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ व युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन ०१-०२ डिसेंबर,२०२४ या कालावधीत मंच क्रं.०१- जिल्हा क्रीडा संकुल, बास्केटबॉल मैदान, नांदेड, मंच क्रं. ०२- डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम परिसर, नांदेड व मंच क्रं.०३- जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड, या ठिकाणी करण्यात आले. या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उदघाटन आज ०१ डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सान्वी जेठवाणी (राज्य निवडणूक दुत, भारत सरकार), चंदा रावळकर (युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, नांदेड), कविता जोशी (जिल्हा समन्वयक,सी.सी.आर.टी न्यु दिल्ली) व्यासपीठावर संजय बेतीवार (क्रीडा अधिकारी), बालाजी शिरसीकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा कार्यासन), चंद्रप्रकाश होनवडजकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक), राहुल श्रीरामवार (क्रीडा अधिकारी), विपुल दापके (क्रीडा अधिकारी), संतोष कनकावार (वरिष्ठ लिपीक) आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवा महोत्सव म्हणजे युवकाना आपल्या मधील कलागुण दाखविण्याचे एक खुले व्यासपीठ असुन या मध्ये युवकांचा सर्वांगिण विकास करणे, देशाची संस्कृती व परपंरा जतन करणे, राष्ट्रीय एकात्मता वाढिस लावणे, युवकाना तृणधान्याचे महत्त्व पटवुन देणे, शिक्षण, उद्योग व्यवसाय, या सोबतच शेती या व्यवसायाशी युवकाची ओळख करून देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्त्व युवकाना पटवुन देणे इत्यादी बाबीवर युवा महोत्सव साजरा करण्यात येत आहे. तसेच यामध्ये प्राविण्य प्राप्त करणारे स्पर्धक हे लातूर येथे संपन्न होणा-या विभागीय युवा महोत्सवात सहभागी होणार आहे. तसेच राज्यस्तरीय युवा महोत्सव आयोजनाचे यजनाम पद नांदेड जिल्हयास मिळालेले असल्यामूळे नांदेड जिल्हयातील जास्त-जास्त स्पर्धक सहभागी होण्याबाबत शुभेच्छा दिल्या.

या युवा महोत्सवामध्ये १) सांस्कृतिक कला प्रकार:- समुह लोकनृत्य, लोकगीत २) कौशल्य विकास:- कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी), कविता (५०० शब्द मर्यादा सहभाग संख्या ०१), ३) संकल्पना आधारीत स्पर्धा:- विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना (Innovation in science and Technology) ४) युथ आयकॉन:- युथ ऑयकान जिल्हयातुन युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित कार्य केलेल्या १५ ते २९ वयोगटातील ५ युवांना विभागीयस्तरावर सहभागी होता येणार आहे. उदघाटन प्रसंगी श्रीमती सान्वी जेठवाणी (राज्य निवडणूक दुत, भारत सरकार) यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा त्यांचे कलागुण विकसित व्हावेत. यासाठी शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचा स्पर्धकांनी उपयोग करुन घ्यावा. त्याचबरोबर मनोरंजनाबरोबरच स्पर्धकांनी खेळाकडे वळावे याबाबत मार्गदर्शन केले.

या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाकरीता सान्वी जेठवाणी यांचेबरोबरच विविध कलाप्रकाराचे परिक्षक म्हणुन संदीप काळे, डॉ.पांचाळ पांडुरंग, डॉ.संदीप देवुळगांवकर, डॉ.मनिष देशपांडे, डॉ.शिवराज शिंदे, डॉ.आनंद आष्टुरकर, डॉ.संभाजी मनुरकर, डॉ.बालाजी पेनूरकर, कविता जोशी, आदी परीक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे प्रस्तावीक बालाजी शिरसीकर यांनी केले तर सुत्र संचलन डॉ. पांचाळ पांडुरंग यांनी केले. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी कार्यालयातील संजय चव्हाण, आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, आकाश भोरे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, इक्रम शेख, चंद्रकांत गव्हाणे, विद्यानंद भालेराव, यश कांबळे आदी परिश्रम घेत आहेत. या युवा महोत्सव चा नांदेड जिल्हयातील रसिकांनी लाभ घ्यावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांनी कळविले आहे.

### नवी मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त होणाऱ्या १० अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या यशात प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या परीने महत्त्वाचा वाटा उचलला आहे. सेवानिवृत्ती हा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या जीवनातील अपरिहार्य भाग असून सेवा निवृत्तीनंतरच्या आयुष्याच्या दुसऱ्या डावात आपल्या आवडीचा छंद जोपासा, कुटुंबीयांना वेळ द्या व महत्त्वाचे म्हणजे आरोग्याकडे लक्ष द्या असा शब्दात अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.

माहे नोव्हेंबर महिन्यात नवी मुंबई महानगर पालिका सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या ९ अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती शुभेच्छा समारंभानिमित्त ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. याप्रसंगी मंचावर उपस्थित प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, विधी अधिकारी अभय जाधव आणि इतर अधिकारी, कर्मचारी यांनी शुभेच्छापर मनोगतं व्यक्त केली. नोव्हेंबर महिन्यात सेवानिवृत्त होणारे लेखा अधिकारी वर्ग २ दीपक पवार, स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे, मुख्याध्यापक सागरनाथ भंडारी, मुख्याध्यापिका प्रतिभा पांचाळ, सहाय्यक अधिसेविका स्मिता विचारे, सिस्टर इन्चार्ज / नाईट सुपरवायझर श्रीम. विमल वानखेडे, प्लंबर - फिटर नंदकुमार थोरात, शिपाई मधुकर निकम, कक्षसेविका सुमती पवार या सेवानिवृत्त आणि वरिष्ठ लिपिक (लेखा) पुरुषोत्तम घरत अशा स्वेच्छानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

# ठाणे जिल्हा रुग्णालयात रविवारी एकाच दिवशी झाल्या ७२ लहान मुलांवर शस्त्रक्रिया

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** ठाणे जिल्हा रुग्णालयात रविवारी १ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून सायंकाळी सातवाजेपर्यंत एकाच दिवसात तब्बल ७२ लहान मुलांवर वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ठाणे जिल्ह्यातील शहापूर,वाडा,जव्हारपासून दुर्गम भागातील आदिवासी तसेच गोरगरीब मुलांवर या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. निमित्त होते विख्यात बालशल्यचिकित्सक डॉ.संजय ओक यांच्या वाढदिवसाचे.

खरतर गेले अनेक दिवस या शस्त्रक्रियांसाठी ठाणे जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार तसेच अन्य डॉक्टर तयारी करत होते. गेल्या दोन दिवसांपासून रुग्ण व त्यांचे नातेवाईक रुग्णालयात दाखल झाले होते. त्यांच्या जेवणापासून ते शस्त्रक्रियेची सर्व जय्यत तयारी करण्यात आली होती. रविवारी सकाळपासून डॉ संजय ओक तसेच पालिकेच्या शिव रुग्णालयातील त्यांचे सहकारी डॉक्टर आणि ठाणे जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांसह आवश्यक कर्मचारीवर्ग शस्त्रक्रिया करत होते. सायंकाळी सातवाजेपर्यंत या ७२ बालकांवरील शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार यांनी सांगितले. यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यामधून ठाणे जिल्हा रुग्णालयात बालकांना शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात येत असल्याचे डॉ संकेत कुलकर्णी यांनी सांगितले. आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत मुरबाड,शहापूर,जव्हार,ठाणे तसेच नवी मुंबईतून या बालकांची निवड करण्यात आल्याचे डॉ कुलकर्णी म्हणाले.

केईएमचे अधिष्ठाता व पालिकेच्या सर्व रुग्णालयांचे संचालक म्हणून १३ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले डॉ. ओक हे वर्षाकाठी शासनाच्या विविध ग्रामीण रुग्णालयात तसेच इमेरीटस प्रोफेसर म्हणून पालिकेच्या शीव रुग्णालयात जाऊन सुमारे एक हजार बालकांच्या शस्त्रक्रिया करतात. यासाठी ते फुटकी कवडीची कोणाकडून घेत नाहीत. केईएमचे अधिष्ठाता व महापालिका रुग्णालयांचे संचालक म्हणून निवृत्त झाल्यानंतर डी.वाय.पाटील संस्थेत कुलगुरू म्हणून डॉ ओक यांनी काम पाहिले. तसेच प्रिन्स अलिखान हॉस्पिटलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. करोनाच्या काळात राज्य शासनाने नियुक्त केलेल्या 'कोविड टास्क फोर्स'चे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य अमूल्य म्हणावे लागेल. सध्या ठाण्यातील कौशल्या हॉस्पिटलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ते काम करत असून केईएममधून निवृत्त झाल्यानंतर एकाही रविवारी सुट्टी न घेता डॉ संजय ओक हे आदिवासी भागातील तसेच गोरगरीब लहान मुलांच्या शस्त्रक्रिया करतात.



आरोग्य विभागाच्या उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयात खाजगी डॉक्टरांनी येऊन स्वेच्छेने रुग्णसेवा करावी, असे आरोग्य विभागाचे धोरण आहे. तथापि फारच थोडे खाजगी तज्ज्ञ अशा प्रकारे ग्रामीण भागातील आरोग्य विभागाच्या रुग्णालयात जाऊन शस्त्रक्रिया करतात. डॉ. ओक हे अशांपैकी एक असून गेली १३ वर्षे दर रविवारी शहापूर उपजिल्हा रुग्णालय, अलीबाग जिल्हा रुग्णालय, पनवेल रुग्णालय तसेच डेरवण येथील वालावलकर रुग्णालयात जाऊन लहान मुलांवरील जटील शस्त्रक्रिया करतात.

डॉ ओक यांचा वाढदिवस २४ नोव्हेंबर असून निवडणुकीमुळे त्या दिवशी फक्त शहापूर उपजिल्हा रुग्णालयात ११ बालकांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.त्यानंतर मुंबई महापालिकेच्या शिव रुग्णालयात साधारण ३५ शस्त्रक्रिया डॉ ओक व टीमने केल्या. तर रविवारी ठाणे जिल्हा रुग्णालयात ७२ शस्त्रक्रिया करून डॉ ओक यांनी आपला वाढदिवस साजरा केला.

या बालरुग्णांना हायड्रोसिल, हार्निया, लघवीच्या जागेवरील त्रास, छोट्या गाठी,ॲपेंडिक्स, दुभंगलेले ओठ तसेच जॉईंट फिंगर म्हणजे चिकटलेली बोटे आदी प्रकारचा त्रास असल्यामुळे शस्त्रक्रियेची आवश्यता होती. मात्र आर्थिक परिस्थितीअभावी त्यांच्या पालकांना या शस्त्रक्रिया करणे परवडणारे नव्हते. डॉ ओक यांच्याबरोबर शीव रुग्णालयाचे डॉ पारस कोठारी, डॉ अभय गुप्ता, डॉ नम्रता कोठारी, डॉ यतीन खैरनार ,डॉ तुळशीदास मंगे, डॉ मनिष कोटवानी, डॉ शाहाजी देशमुख, डॉ मैत्रेयी सावे, डॉ आदिती दळवी, डॉ सुकन्या विंचुरकर, डॉ प्रतिक्षा जोशी, डॉ मुग्धा नायक तसेच ठाणे जिल्हा रुग्णालयातील डॉ एन. रोकडे व विनोद जोशी यांचा शस्त्रक्रियेत सहभाग असल्याचे सूत्रांनी सांगितले. डॉ. ओक यांनी आतापर्यंत वैद्यकीय व सामाजिक विषयावर ५३ पुस्तके लिहिली असून वाढदिवसानिमित्त ६५ शस्त्रक्रिया करण्याच्या संकल्पनेविषयी विचारले असता, ते म्हणाले की,आदिवासी दुर्गम भागातील गोरगरीब लहान मुलांच्या शस्त्रक्रिया करणे हे मी झाले कर्तव्य मानतो. १३ वर्षापूर्वी केईएममधून निवृत्त झाल्यापासून मी आठवड्यातील प्रत्येक रविवार आदिवासी दुर्गम भागातील गरीब लहान मुलांवर शस्त्रक्रिया करतो. अन्य खाजगी व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांना शासकीय रुग्णालयात जाऊन गोरगरीब रुग्णांवर उपचार करावे अशी अपेक्षाही डॉ ओक यांनी व्यक्त केली.

साधारणपणे वर्षाकाठी मी वेगवेगळ्या शासकीय रुग्णालयात जाऊन ७०० ते हजार शस्त्रक्रिया करतो. ज्या जटिल शस्त्रक्रिया शासकीय रुग्णालयात करता येणे शक्य नसते, अशा शस्त्रक्रिया ठाण्यातील कौशल्या रुग्णालयात केल्या जातात तर कर्करोगादी अन्य काही मोठ्या पालिकेच्या शीव रुग्णालयातही शस्त्रक्रिया करतो, असेही डॉ ओक म्हणाले.

### उदगीरला मंत्रिपद मिळावे, म्हणजे विकासाला गती येईल - स्वप्निल जाधव



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०१, उदगीर (लातूर) :** उदगीर विधानसभा निवडणुका संपल्या. तेव्हाच राजकीय हेवेदावे आणि मतभेद ही संपले. आम्ही उदगीरच्या विकासाचा आराखडा घेऊनच विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरलो होतो. मात्र जनता जनार्दनाने दिलेला निर्णय आम्ही सिरसावंद मान्य केला आहे. आजही आमच्या डोक्यात उदगीरच्या विकासाचेच विचार आहेत. आणि उदगीर विधानसभा मतदारसंघाचा विकास व्हावा, उदगीर जिल्हा व्हावा, उदगीरला उद्योग धंदे उभारण्यासाठी मोठी एमआयडीसी व्हावी. अशीच आमची सकारात्मक भूमिका आहे. या भूमिकेतूनच आम्ही उदगीरला जर मंत्री पद मिळाले तर त्याचे निश्चित स्वागत करू. असे विचार युवा नेते तथा उदगीर विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार स्वप्निल अण्णा जाधव यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

विधानसभेचे राजकारण संपलेले आहे. आता प्रत्यक्ष समाजकारणासाठी आपण सदैव जनतेच्या सुख - दुःखात सहभागी राहणार आहोत. उदगीर विधानसभा मतदार संघातील जनतेने प्रेम दिले आहे. त्याची जाणीव ठेवून जनतेसाठी जे काही चांगले करता येईल, ते ते करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. असे ही स्वप्निल अण्णा जाधव यांनी स्पष्ट केले आहे. उदगीर तालुका आणि जळकोट तालुका कशा पद्धतीने विकासाकडे घेऊन जाता येईल. या दृष्टीने सकारात्मक विचारधारा ठेवून काम करणार आहे. आणि या कामाच्या दरम्यान आपले राजकीय विचाराचे जोडे बाजूला ठेवून फक्त सृजनात्मक कार्याला गती देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. असेही स्वप्निल जाधव यांनी याप्रसंगी स्पष्ट केले आहे. लवकरच आपण मतदार संघात आभार दौरा काढणार आहोत. जनता जनार्दनांनी प्रेम दिले, त्यामुळे आपण त्यांचे आभार व्यक्त करणे हे नैतिक कर्तव्य आहे. त्यामुळे धन्यवाद दौरा लवकरच काढणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त फलाट तिकीट विक्री बंद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, मुंबई :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवरील गर्दी नियंत्रित करण्यासाठी फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. त्यानुसार फलाट तिकिटांच्या विक्रीवर २ ते ९ डिसेंबरपर्यंत निर्बंध घातले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशविदेशातील लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी येतात.

त्यामुळे रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर प्रचंड गर्दी होते. त्यामुळे फलाटांवरील गर्दी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने लांब पल्ल्यांच्या स्थानकांवर फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्याचानिर्णय घेतला आहे.